REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ.
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख २९ मे, १९४० | अंक २२

लेखक—अत्रे.

## अर्धांगी

दिग्दर्शक-विनायक

( वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. चे (खास व्यवस्थेखालील) पुणें मिनर्व्हांत ५ वा आठवडा
पुणें-फोन ३९८

लेखक—आचार्य अत्रे, दिग्दर्शक—विनायक, छायालेखक—पांडुरंग नाईक.
भूमिकाः—विनायक, लीला चिटणीस, मीनाक्षी, साळवी, मालवणकर, सौ. वसिष्ठ, कु. देशपांडे, आणि बाबुराव पेंढारकर

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कँटब), बार-अॅट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील अँड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहाहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ अॅण्ड जनरल अॅशुरन्स लिमिटेड.
हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.
एजन्सीकरितां आजच लिहा.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें.

पूर्ण स्वदेशी,
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

## विविध माहिती

**बेल्जम व हॉलंड ह्या देशांशीं पोस्टल व्यवहार बंद**

बेल्जम, हॉलंड व लक्सेंबर्ग ह्या देशांशीं होणारे हिंदी पोस्टाचे व्यवहार बंद करण्यांत आले आहेत.

**बूट आणि शू ह्यांचा स्वयंपूर्ण स्वदेशी धंदा**

हिंदुस्थानांत बूट व शू तयार करण्याचे कारखाने असले तरी त्यां मालाचे कांहीं भाग ( टाचा, शिवण्याची तार, दोरा इत्यादि ) बाहेरून आणावे लागत असत. आतां हिंदुस्थान सरकारच्या सहायानें ह्या बाबतींतलें हिंदी कारखानदारांचें परराष्ट्रांवरचें अवलंबन दूर होईल.

**स्वित्सर्लंडमधील हॉटेलांचा धंदा**

स्वित्सर्लंडमध्यें हॉटेलांचा धंदा महत्त्वाचा गणला जातो. त्यांची संख्या हजारांनीं मोजावी लागते आणि त्यांचा फायदा लाखो परस्थ लोक दर उन्हाळ्यांत व हिवाळ्यांत घेत असतात. ह्या धंद्यांत पाऊण लक्ष माणसें गुंतलेलीं आहेत. युद्धामुळें हॉटेलांच्या मालकांवर संकट आलें आहे. गिऱ्हाइकें मिळेनाशीं होऊन त्यांची मिळकत संपुष्टांत आली आहे.

**डन्लॉप कंपनीचा नफा**

डन्लॉप ह्या जगद्विख्यात कंपनीस गेल्या वर्षी एकूण सवा पांच कोटि रुपये नफा झाला.

**ब्रिटन-अमेरिका हुंडणावळ**

पौंड-डॉलर हुंडणावळींच्या स्थैर्यासाठी ब्रिटिश सरकार आपल्या नागरिकांनीं धारण केलेले अमेरिकन रोखे स्वतःच्या ताब्यांत घेत आहे आणि ते धारण करणारांस पौंडामध्यें मोबदला देत आहे. ह्या अमेरिकन रोख्यांची दुसरी यादी प्रसिद्ध झाली आहे आणि तीमध्यें नमूद झालेल्या रोख्यांची एकूण किंमत ७०-८० कोटि रुपये आहे. एवढ्या किंमतीचे डॉलर्स ब्रिटिश सरकारास आपलें अमेरिकेचें देणें भागवण्यास उपयोगी पडतील.

**हिंद-जपान व्यापारी कराराच्या वाटाघाटी**

हिंदी कपाशीच्या निर्गतीचे संबंधांत योग्य धोरण कोणतें असावें ह्याचा विचार होण्यास थोडा अवधि लागणार असल्याकारणानें हिंद-जपान व्यापारी कराराच्या वाटाघाटी कांहीं काळापुरत्या पुढें ढकलण्यांत आल्या आहेत.

**जर्मनीचा निषेध**

अमेरिका संडांतील चोवीस राष्ट्रांनीं जर्मनीच्या हॉलंड, बेल्जम व लक्सेंबर्गवरील आक्रमणाचा निषेध जुटीनें करण्याचें ठरवलें आहे.

**नाझी आणि कम्युनिस्ट दोघे सारखेच**

फ्रेंच समाजसत्तावादी पक्षाचे प्रसिद्ध पुढारी मि. ब्लम इंग्लंडमध्यें ब्रिटिश कामकरी पक्षाच्या परिषदेंत भाषण करतांना म्हणालेः- "प्रस्तुत युद्ध भांडवलशाहीचें नाहीं. त्यांत जर्मनीचा जय झाल्यास भांडवलशाहीवर त्याचा काय परिणाम होईल हें मला सांगतां येत नाहीं, पण समाजसत्तावादाचें त्या योगानें काय होईल हें मी जाणतों. ( समाजसत्तावादाचा नाश होईल ). जर्मन नाझी आणि कम्युनिस्ट ह्यांच्यामध्यें कांहीं भेद नाहीं. नाझींनीं फ्रान्समध्यें कम्यूनिस्ट विचारांचीं हस्तपत्रकें विमानांतून खालीं टाकलीं."

**पेशवे दप्तरांत अभ्यासकांस सवलत**

इतिहासाच्या साधनांचा अभ्यास करणाऱ्या इच्छिणाऱ्या संशोधकांस पेशवे दप्तरांत कागदपत्र पहाण्याची सवलत एक वर्षपर्यंत देण्याचें मुंबई सरकारनें ठरवलें आहे.

**हिंदी रेल्वेजचें उत्पन्न वाढत आहे**

१९३९ च्या एप्रिलच्या पहिल्या १० दिवसांत हिंदी रेल्वेजना जेवढें उत्पन्न झालें, त्यापेक्षा २३ लक्ष रुपये अधिक उत्पन्न १९४० च्या तत्सम मुदतींत झालें. पुढच्या १० दिवसांतील उत्पन्नाची वाढ २७ लक्ष रुपये भरली. आगबोटींत मालास जागा मिळत नसल्यामुळें जो माल पूर्वी आगबोटींतून जात असे तो आतां आगगाड्यांतून न्हावा लागतो, हें ह्या उत्पन्नाच्या वाढीचें कारण आहे.

**पॉवर ऑल्कोहॉल**

संयुक्त प्रांतांत काँग्रेस मंत्रिमंडळानें काकवीपासून ऑल्कोहॉल तयार करण्याचे संबंधांत एक कायदा मंजूर करून घेतला होता, त्यास प्रांतिक गव्हर्नरांची संमति मिळून ह्या धंदा भांडवलवाल्यांनीं चालू करण्यास संधि दिली जाईल असें म्हणतात.

**युद्धसामुग्रीचें हिंदुस्थानांत भरपूर उत्पादन**

हिंदी सैन्यास लागणारी बहुतेक सामुग्री हिंदुस्थानांतच तयार होत असून तिचा पुरवठा पश्चिमेकडील रणांगणावरहि केला जात आहे. मोटारगाड्या व विमानें वगळलीं तर बाकी सर्व प्रकारचा लढाऊ उपयोगाचा माल येथें तयार करण्यांत येत आहे. सिंगापूर, हाँगकाँग, इजिप्त येथेंहि ह्या मालाचा पुरवठा होत आहे.

**हिंदी कस्टम्सचें साडेचवेचाळीस कोटींचें उत्पन्न**

हिंदी कस्टम्सचें मध्यवर्ती सरकारास १९३८-३९ सालीं साडेचवेचाळीस कोटि रुपये उत्पन्न मिळालें. त्याच्या वसुलीचा खर्च एक कोटि रुपये झाला.

**बेल्जम**

सध्या बेल्जमकडे सर्व जगाचे डोळे लागून राहिले आहेत. त्याची लोकसंख्या अवघी ८३ लक्ष आहे, पण सक्तीच्या लष्करी शिक्षणामुळें प्रसंगीं दहा लक्ष सैन्य त्यास उभारतां येण्यासारखें आहे. बेल्जमपाशीं आरमार नाहीं आणि विमानबळ बेताचें आहे. लक्सेंबर्गची लोकसंख्या तीन लक्ष आहे.

**"पाहिजे"**

पतितांची नैतिक सुधारणा करण्याचे कामीं एक सहायक हवा होता. उमेदवारांमध्यें पुढें दर्शवलेल्या गुणांची अपेक्षा करण्यांत आली होतीः—" गाढवाचा सहनशीलपणा, मुंगीचा कष्टाळूपणा, कोकराचा शांतपणा, ऱ्हिनॉसेरॉसचें चिवट कातडें, भविष्यवाद्याचें दूरदर्शित्व आणि मातेचें प्रेम."

**टेलिफोन सरकारी होणार**

कलकत्ता, मुंबई व मद्रास येथील टेलिफोन त्यांच्या कंपन्यांकडून हिंदुस्थान सरकार १९४३ सालापूर्वी घेण्याच्या विचारांत आहे. कंपन्यांचे प्रतिनिधी व सरकारचे अधिकारी ह्यांचेमध्यें सिमला येथें गेल्या आठवड्यांत वाटाघाटी झाल्या आणि त्यांत टेलिफोनच्या किंमतीचा विचार झाला.

**सेगांवांत जाण्याचे रस्ते**

सेगांवांत जाण्याचे रस्ते तयार करण्यासाठी मुंबई सरकारनें चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत ३ लक्ष, ५० हजार रुपयांची तरतूद केली आहे. तिच्यापैकी १ लक्ष, ५९ हजार रुपये मध्यभागाच्या रस्त्यास आले आहेत. पूर्वी हातीं घेतलेले रस्ते अक्टोबर पुरे झाले पाहिजेत असें सुचवण्यांत आलें आहे.

**काम बंद, वेतन बंद**

प्रांतिक कायदेमंडळाच्या सभासदांस राज्यघटनाविषयक परिस्थितीमुळें कांहीं काम नसल्यामुळें त्यांचें मासिक वेतन जुलैपासून बंद करण्याचें मुंबईच्या गव्हर्नरांनीं ठरवलें आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २५४ |
| २ शेतकऱ्यांच्या कर्ज निवारणाचा कायदा ... | २५५ |
| ३ युद्धाच्या हालचाली | २५६ |
| ४ स्फुट विचार ... | २५७ |
| आयात व्यापाराचें नियंत्रण आणि हुंडणावळ—हिंदुस्थानचा युद्धकालीन परराष्ट्रीय व्यापार—विमा कायद्यानें उत्पन्न केलेल्या अडचणी—मुंबईचा शेअर बाजार—शेअर बाजाराविषयीं सरकारचा निर्णय | |
| ५ हिटलरशाहीच्या प्रतिकारार्थ स्वार्थत्याग | २६१ |
| ६ निवडक बाजारभाव | २६३ |

# अर्थ

बुधवार, ता. २९ मे, १९४०

## शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणाचा कायदा

हिंदी शेतीचा धंदा कायमचाच अडचणीचा असून शेतकरीवर्गाची परिस्थिति नेहमीच ओढगस्तपणाची असते, हें सुप्रसिद्ध आहे. सामान्य शेतकऱ्यांच्या हिशेबाची वार्षिक तोंडमिळवणी होत नाहीं आणि त्यातून दुष्काळाचें एखाददुसरें वर्ष मधून मधून येतें किंवा विवाहादि कार्यासाठीं त्यास जादा खर्च करावा लागतो, तेव्हां कर्ज काढण्यावांचून त्यास गत्यंतर नसतें. खराबीच्या वर्षांची अशी परंपरा लागली किंवा व्याजामुळें कर्ज फुगत राहिलें म्हणजे शेतीच्या धंद्याबरोबर जमिनीहि शेतकऱ्यांच्या हातून जातात आणि ह्या रीतीनें समाजाचें आर्थिक नुकसान होतें. शेतकऱ्यांचीं जुनीं कर्जें नाहींशीं किंवा हलकीं होऊन त्यांस आपला धंदा फायद्यासाठीं नाहीं तरी निदान पोटासाठीं चालवतां यावा ह्या हेतूनें आजवर अनेक योजनांचा विचार होऊन त्यांपैकीं कांहीं अमलांतहि आल्या आहेत. डेकन ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलीफ म्हणजे शेतकऱ्यांचा कायदा ह्याच उद्देशानें करण्यांत आला. कर्जफेडीबाबत शेतकऱ्यांस कित्येक सवलती त्या कायद्यानें दिल्या आणि सावकारांवर नियंत्रणें घातलीं. तथापि, शेतकरीवर्गाची पैशाची निकड आणि सावकारांचा आपण दिलेलीं कर्जें सुरक्षित व फायदेशीर करण्याची स्वाभाविक इच्छा ह्या दुहेरी कारणामुळें शेतकरी-कायद्याचा अपेक्षित सुपरिणाम झाला नाहीं आणि त्यामुळें शेतकरीवर्गाच्या हितास प्रतिकूल अशा नवीन भानगडी त्यामधून उपस्थित झाल्या. सहकारी पतपेढ्यांचा व अलीकडे जमीन-गहाणाच्या सहकारी बँकांचा प्रसार झाला असला तरी त्यांचें कार्यक्षेत्र मर्यादितच राहिलें असल्यास त्यांत नवल नाहीं. १९३१ सालीं जागतिक आर्थिक मंदीची साथ चालू झाली आणि तिचे दुष्परिणाम आठ वर्षें शेतकरीवर्गास भोगावे लागले. शेतीच्या मालाचे बाजारभाव पडले तेव्हां कर्जाच्या ओझ्यानें टेकीस आलेल्या शेतकरी वर्गाची स्थिति अधिकच बिघडली. त्यांच्या कर्जाची परतफेड होण्याची मारामार झाली आणि चालू शेतकामास पैसा मिळण्याची त्यास पंचाइत पडली. आर्थिक मंदीच्या आपत्तीमधून सहकारी संस्थाहि सुटल्या नाहींत आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांचा धंदा व संसार कसा चालावा ह्याची विवंचना उत्पन्न झाली. ह्या विपन्न स्थितीवर एक रामबाण उपाय योजणें कठिण होतें आणि विशेषतः बाजारभाव पडले होते, त्यांस चालना देण्याची सत्ता व शक्ति प्रांतिक सरकारांतहि नव्हती.

शेतीच्या धंद्यांत सुधारणा करून त्याचें उत्पादन वाढवणें, शेतीच्या मालाच्या किफायतशीर विक्रीची तजवीज करणें, खेडेगावी धंद्यांस उत्तेजन देणें इत्यादि अनेकविध उपाय एकाच वेळीं योजल्यावांचून शेतकरीवर्गाच्या स्थितींत सुधारणा होणें अशक्य होतें. त्यांच्याबरोबर किंवा अगोदरहि शेतकऱ्यांचीं कर्जें तडजोडीनें कमी करण्याच्या योजना प्रांतिक सरकारांनीं हातीं घेतल्या. मुंबई प्रांतांत काँग्रेस मंत्रिमंडळानें राज्यकारभाराची जबाबदारी स्वीकारली तेव्हां त्याच्या खेडेगांवांच्या सुधारणेच्या कार्यक्रमांत ज्या बाबींचा अंतर्भाव करण्यांत आला त्यामध्यें शेतकऱ्यांच्या कर्जाचा बोजा हलका करण्याच्या योजनेस महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें. मध्यप्रांतांत कर्जलवाद मंडळांची स्थापना करण्यांत आली होती आणि मद्रास सरकारानें शेतकऱ्यांवरील कर्जाच्या मुद्दलाचा व व्याजाचा बोजा कमी करण्याची योजना अंमलांत आणली. मुंबई सरकारची योजना ह्यापेक्षा भिन्न आणि अधिक दूरगामी व परिणामकारक होती. शेतकरीवर्गाच्या कर्जबाजारीपणाचा रोग इतका जुनाट झाला होता आणि त्याचीं मुळें इतकीं खोल गेलीं होतीं कीं, नुसत्या वरच्या मलमपट्टीनें काम भागण्यासारखें नव्हतें. शेतकऱ्यांच्या कर्जाची रकम कांहीं प्रमाणांत कमी होणें वेगळें आणि ती रकम त्याच्या ऐपतीच्या आटोक्यांत आणून ठेवणें वेगळें. कर्ज अशा प्रमाणांत हलकें झालें पाहिजे कीं सूट जाऊन राहिलेली त्याची बाकी हप्तेबंदीनें फेडतां येऊन शेतकऱ्यास आपले मामुली व्यवहार अत्यंत काटकसरीनें पण निश्चितपणानें चालवतां यावे. ज्या कर्जदारांपाशीं हें करण्याचीहि शक्ति नसेल त्यांची नादारीच्या मार्गानें मुक्तता झाली पाहिजे.

ह्या मूलभूत तत्त्वांवर कायद्याची उभारणी करण्यांत अनेक अवघड व गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित होणें अपरिहार्य आहे. सर्व शेतकरी कर्जदारांस कायदा लागू करावा का कांहीं मर्यादेंत त्याची अंमलबजावणी व्हावी? कर्जाची रकम कशी निश्चित करावी? तारण असलेल्या व बिन तारणाच्या कर्जांत फरक कसा करावा? कर्जफेडीची ऐपत कशी ठरवावी? परतफेडीची तरतूद कशी करावी? धनकोंच्या हक्काची वगवारी कशी करावी? कर्जदारांस चालू कामासाठीं कर्ज मिळण्याची व्यवस्था कशी करावी? कायद्याच्या योजनेंत सहकारी संस्थांचें स्थान कोणतें असावें? कर्जाची रकम आणि त्याची परतफेड ह्यांविषयींचा निवाडा कोणी करावा आणि त्याची अंमलबजावणी कशी व्हावी? ह्या व दुसऱ्या असल्या प्रश्नांचीं स्पष्ट व तपशीलवार उत्तरें कर्जनिवारणाच्या कायद्यांत सापडलीं पाहिजेत. मुंबई सरकारानें केलेल्या कायद्यास गव्हर्नर जनरलांची संमति मिळून तो आतां पक्का झाला आहे. युद्धपरिस्थितीमुळें त्याची अंमलबजावणी लांबणीवर पडणें संभवनीय असलें तरी कायद्यास अनुसरून नियम सरकार करील आणि शक्य तितक्या लवकर त्यांचा फायदा कर्जदारांस मिळण्याची व्यवस्था करील अशी अपेक्षा आहे. कांहीं झालें तरी ह्या कायद्याशीं ज्यांचा संबंध येईल, त्यांस

त्याच्या तत्त्वांची व अंमलबजावणीच्या तपशीलाची चांगली माहिती असणें आवश्यक आहे. ही माहिती विस्तृत व सुबोध रीतीनें देण्याचें काम आमचे सहकारी मित्र, श्री. विनायक गणेश तिखे, ह्यांनीं "शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा आणि त्याचें विवेचन" हें पुस्तक* योग्य वेळीं प्रसिद्ध करून केलें आहे. वर निर्दिष्ट केलेल्या अनेक प्रश्नांचे बाबतींत कायद्यांत काय तजविज़ी आहेत ह्यांची फोड सोप्या भाषेंत व कित्येक ठिकाणीं उदाहरणें देऊन ग्रंथकारानें केली आहे. मूळ कायदा इंग्रजींत आणि त्याचें मराठी रूपांतर पुस्तकांत प्रथम आलें असून त्याच्या कलमांवरील भाष्य क्रमाक्रमानें दिलें आहे. सहकारी पतपेढ्या व बँका ह्यांस जरी थोडेंबहुत संरक्षण सरकारी येण्याच्या बरोबर कायद्यानें दिलें आहे तरी कमी करण्यांत आलेल्या कर्जाच्या फेडीचे आणि नवीन कर्जें देण्याचे संबंधांत विशेष जबाबदारी येऊन पडणार आहे. ह्या परिस्थितीचा विशेष खुलासा ग्रंथकारानें केला आहे आणि सहकारी संस्थांस सावधगिरीची सूचना दिली आहे ती उपयुक्त आहे. सहकारी संस्थांच्या सहकारी घटनेस व त्यांच्या अस्तित्वास बाध येणार नाहीं अशा रीतीनें कायद्याची रचना व अंमलबजावणी होणें अगत्याचें आहे, पण त्याच्या रगाड्यांत सावकारांबरोबर ह्या संस्था भरडून निघतात कीं काय अशी सामान्यतः वाटणारी भीति सर्वस्वी निराधार आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. ह्या प्रश्नाची फोड ग्रंथकर्त्यानें अधिक विस्तारानें व स्पष्टपणानें केली असती तर तें विशेष उपकारक झालें असतें असें वाटल्यावांचून रहात नाहीं. सहकारी बँका व पुढारी ह्यांनीं सरकारचें लक्ष ह्या प्रश्नाकडे वेळोवेळ वेधलें आहे, पण तेवढ्यानें कार्यभाग होईल असें वाटत नाहीं.

आपल्या विवेचनांत पाल्हाळिकपणा असल्याची जाणीव ग्रंथकर्त्यास आहे आणि ती त्यानें प्रांजलपणानें व्यक्त केली आहे. तरीहि, विवेचनाच्या सुबोधतेस आवश्यक नसलेली पुनरुक्ति ग्रंथांत पदोपदीं झालेली आहे ती त्यास खाचित टाळतां आली असती. विवेचनाकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावें अशी सूचना दर दहापंधरा ओळींत वाचकांस केल्यानें त्यांच्या मनावर कांहीं अधिक परिणाम होईल असें नाहीं. उलट, अशा प्रकारच्या अडगळीनें ग्रंथाचा विस्तार निष्कारण वाढतो. ग्रंथांतील निरनिराळ्या प्रकरणां (लेख ?) तील विषयांची किंवा विशिष्ट प्रकरणांतील मजकुराची जुळणी करण्यासहि तिचा उपयोग होण्यासारखा नाहीं. तसेंच, पुस्तकास सूची जोडली असती तर ती उपयुक्त ठरली असती. हे दोष मुख्याचे नाहींत आणि ते सोडून दिले असतां श्री. तिखे ह्यांनीं प्रस्तुत पुस्तक परिश्रमपूर्वक लिहून प्रसिद्ध केलें आहे, त्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत, हें नमूद करण्यांत आम्हांस आनंद वाटतो. शेतकरीकर्जनिवारणाच्या कायद्याची समजूत पटण्यास पुस्तकाचें चांगलें सहाय होईल, आणि त्याचा ह्या कामीं उपयोग विस्तृत प्रमाणांत केला जाईल अशी आम्हांस आशा आहे.

* शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा आणि त्याचें विवेचन: लेखक–श्री. विनायक गणेश तिखे, ४२, बुधवार पेठ, पुणें. किंमत १ रु. ४ आणे.

## युद्धाच्या हालचाली

लढाईचे अनपेक्षित असे डावपेच लढवून आणि फ्रेंच सेनानींच्या एका चुकीचा फायदा घेऊन जर्मनीनें आपल्या फौजा फ्रान्समध्यें घुसवल्या आणि पश्चिम समुद्र व पॅरिस ह्यांच्या रोखानें झपाट्यानें चाल केली. ह्या अनपेक्षित घटनेमुळें जर्मन सैन्यांनीं बरीच प्रगति केली. चिलखती गाड्या व बॉंब टाकणारीं विमानें त्वरित रीतीनें पुढें पाठवून आणि विमानी छत्र्यांच्या सहायानें उड्डाण करणारे सशस्त्र सैनिक प्रतिस्पर्ध्यांच्या पिछाडीस उतरवून गोंधळ उडवून द्यावयाचा ह्या जर्मनीच्या डावपेचामुळें ही चाल शक्य झाली आहे. तथापि, ह्या प्रगतीचा खरा उपयोग शत्रूच्या मुख्य फौजा पुढें चालून गेल्यावांचून कांहीं होणें शक्य नाहीं, ही गोष्ट जर्मनीच्या वरवर दिसणाऱ्या यशाचा विचार करतांना लक्षांत ठेविली पाहिजे आणि त्यापासून उद्भवणाऱ्या भीतीस लोकांनीं थारा देतां कामा नये. बेल्जम व फ्रान्स ह्या देशांत सध्या चाललेल्या लढाया हालत्या स्वरूपाच्या आहेत. दोन बाजूंच्या फौजांनीं कोणतेंहि ठाणें धरून बसावें आणि तेथें त्यांचे दोन हात व्हावे किंवा त्यांनीं एकमेकांस मागें हटण्यास लावण्याचा प्रयत्न करावा ह्या मामुली स्वरूपाचा सध्याचा झगडा नाहीं. आज शत्रूनें पादाक्रांत केलेला प्रदेश उद्या त्याचे हातून परत मिळवावा आणि पिछेहाटीचें रूपांतर प्रगतींत व्हावें अशी बदलती स्थिति रणांगणावर दिसत आहे. जनतेचा गैरसमज होऊन तिनें युद्धाच्या हालचालींविषयीं भलती कल्पना करून घेऊं नये म्हणून जरूर तो प्रचार इंग्लंड व फ्रान्स ह्या देशांत होत आहे हें योग्य आहे. पण तेथील प्रधान मंडळें ह्या पुढें गेलीं असून त्यांनीं वस्तुस्थिति आपल्या लोकांपुढें प्रांजलपणानें मांडली आहे. रणांगणावरचा प्रसंग आणीबाणीचा आहे हें त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें असून अखेर आपण विजय मिळवणार ह्याविषयीं दृढ विश्वास प्रकट केला आहे. तथापि शत्रूस मागें हटवून त्याचा पूर्ण पराभव होण्यास प्रत्येक नागरिकानें अमर्याद स्वार्थत्यागास आतां तयार झालें पाहिजे असें त्यांनीं निक्षून सांगितलें आहे. लहान, मोठा, स्त्री, पुरुष, कारखानदार, मजूर, कोणीहि असो प्रत्येकानें राष्ट्रासाठीं तनमनधन अर्पण करणें अगत्याचें आहे, ह्याची त्यांनीं जनतेस जाणीव करून दिली आहे. ब्रिटिश पार्लमेंटानें सर्वाधिकार आपल्या सरकारास कायद्यानें त्वरित देऊन टाकले आहेत, हें ब्रिटिश लोकांच्या जुटीचें व दृढनिश्चयाचें सुचिन्ह आहे. सबंध बेल्जम पादाक्रांत करून आणि पॅरिसपर्यंत पुढें घुसून गोंधळ माजवण्याचा प्रयत्न केल्यावांचून हिटलर रहाणार नाहीं. ह्या त्याच्या डावपेचांत त्यास एकदां अपयश आलें आणि दोस्त राष्ट्रांनीं कांहीं ठिकाणीं जर्मन सैन्याची पीछेहाट केली कीं हिट्लरच्या मनोराज्याचा डोलारा कोसळण्यास उशीर लागणार नाहीं. हे उलट डावपेच लढवण्याची तयारी आतां दोस्त राष्ट्रांनीं चालवली आहे. मागील महायुद्धांत त्यांच्यावर असाच प्रसंग आला असतां निकरानें, जुटीनें व व्यवस्थेनें लढून शेवटीं त्यांनीं शत्रूचा पराजय केला. तशाच, पण थोड्या बदललेल्या परिस्थितींत, दोस्त राष्ट्रें आपल्या शक्तीचा पूर्ण उपयोग करून जर्मनीवर अखेर मात करतील ह्यांत संशय नाहीं. युद्धाच्या येणाऱ्या बातम्यांचा विचार वरील दृष्टीनें प्रत्येकानें केला पाहिजे. जर्मन फौजेनें हें शहर घेतलें, तें शहर घेतलें असें वृत्त ऐकूं आलें तरी युद्धाच्या अंतिम परिणामाच्या दृष्टीनें त्यास किती किंमत द्याव-

याची ह्याचा विचार करणें आवश्यक आहे. हिटलरनें आपलें शक्तिसर्वस्व पणास लावलें आहे; पण दोस्त राष्ट्रांच्या जबरदस्त सामर्थ्याचा प्रभाव त्याच्या अनुभवास ह्या पुढेंच यावयाचा आहे.

शत्रूच्या बलाची आणि त्याची चढाई थोपवून त्यास परतवून लावण्यास आपली शक्ति किती व कशी खर्चली पाहिजे ह्याची पूर्ण जाणीव होऊन तिला अनुसरून उपायांची सिद्धता करणें हें यशाचें निश्चित चिन्ह आहे. जर्मन फौजेची पहिली लाट बेल्जम व फ्रान्स ह्या देशांत येऊन दोस्त राष्ट्रांची ह्या प्रकारची तयारी आतां झाली आहे व होत आहे. इंग्लंड व फ्रान्स ह्या दोन्ही राष्ट्रांत योजावयाच्या युद्धाच्या उपायांबाबत जनतेची एकवाक्यता झाली आहे. लढाऊ सामुग्री बनवावयाच्या कारखान्यांत कामकरी वर्ग उत्पादनाची शिकस्त करण्यास सज्ज आहे. इंग्लंडमध्यें कामकरी वर्गाच्या वतीनें त्यासंबंधांत हार्दिक आश्वासन सरकारास देण्यांत आलें आहे आणि फ्रान्समध्येंहि तीच अभिनंदनीय व उत्तेजनकारक स्थिति आहे. प्रच्छन्न शत्रूंपासून संरक्षण करण्यास हजारो स्वयंसेवक इंग्लंडमध्यें तयार झाले असुन त्यांस सरकारनें कामें वांटून दिलीं आहेत. ह्या युद्धांत जर्मनीनें सर्व देशांत फंद-फितुरीवर बरीच भिस्त ठेवली आहे. विमानी छत्र्यांच्या आश्रयानें उतरणाऱ्या सैनिकांच्या कारवाईचा प्रतिकार करण्याची व्यवस्था पद्धतशीर रीतीनें चालली आहे आणि माऱ्याच्या सर्व जागीं ह्या बाबतींत योग्य बंदोबस्त करण्यांत येत आहे. ह्या छत्रारूढ शत्रू-इतकेच देशांत फंदफितुरी माजवून त्यांस मदत करणारे परस्थ व स्थानिक लोक भयंकर असल्यानें त्यांस शोधून काढून डांबून टाकण्याचें काम सरकारनें त्वरित केलें आहे. कम्यूनिस्ट व फॅसिस्ट वृत्तीच्या लोकांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि प्रामाणिक मतभेदाचा प्रश्न येथें नसून अंतस्थ शत्रू हुडकून त्यांस वेळींच स्थानबद्ध करण्याची अत्यंत जिव्हाळ्याची ही बाब आहे. जर्मनीच्या चढाईस व हल्ल्यास तोंड देतांना आपणांस स्वतःच्या देशांतच प्रच्छन्न शत्रूचा त्रास होणार नाहीं अशी खबरदारी दोस्त राष्ट्रांच्या सरकारांस घ्यावी लागली आहे; आणि ती त्यांनीं ऐन वेळीं घेतली हें समाधानकारक आहे. फ्रान्समध्यें चाललेल्या लढाईच्या बातम्याहि अशा तऱ्हेनें देण्यांत येत आहेत कीं, त्यांचा उपयोग शत्रूस करतां येऊं नये. दोस्तराष्ट्रांच्या फौजांच्या हालचालींची माहिती शत्रूस होणार नाहीं अशी काळजी युद्धाच्या बातम्यांचे बाबतींत घेतली जात आहे.

---

### "शेतकी आणि शेतकरी"

ह्या मासिकाच्या मे महिन्याच्या अंकांत संपादकीय, ग्रामोद्धार, दुय्यम धंदे, "कोंबड्यांखाली अंडीं ठेवून उबवण्याची योजना," विविध, महाराष्ट्रांतील शेतकीचें विविध कार्य, सासवड येथील जमाबंदी, शेती सुधारणा, तालुका शेतकी सुधारणा—तालुका शेतकी सुधारणा केंद्र, सभा, संमेलनें इत्यादि विषयांवर उपयुक्त विवेचन व माहिती प्रसिद्ध झाली आहे.

### "शिक्षक–मित्र"

"बृहन्महाराष्ट्रांतील प्राथमिक शिक्षकांच्या सर्वस्वी हितास वाहिलेलें व त्यांची बाजू जनता आणि सरकार यांपुढें निःपक्षपातपणें मांडणारें" हें पाक्षिक पत्र कराड येथें प्रसिद्ध होऊं लागलें आहे. मुंबई इलाख्यांतील प्राथमिक शिक्षणाच्या १९३१ पासूनच्या प्रगतीची माहिती, शिक्षकवर्गाच्या तक्रारी, सूचना इत्यादि विषय ह्या पाक्षिकाच्या ताज्या अंकांत आले आहेत.

## स्फुट विचार

### आयात व्यापाराचें नियंत्रण आणि हुंडणावळ

युद्ध म्हटलें कीं नियंत्रण आलें. जनतेची होईल तितकी कमी गैरसोय होऊन युद्धास सहाय अधिकांत अधिक होईल ह्या बेतानें व्यवहाराचें हें नियंत्रण केलें जातें. अंतर्गत आणि बाहिर्गत व्यापारांत युद्धोपयोगी मालास अग्रस्थान मिळावें आणि शत्रूची ह्या बाबतींत नाकेबंदी व्हावी हा या धोरणाचा मुख्य उद्देश असतो, ह्याप्रमाणें हिंदी निर्गत व्यापाराच्या बाबतींत हिंदुस्थान सरकारानें नियंत्रण चालवलें आहे आणि ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांस येथन कच्चा-पक्का माल मुबलक मिळावा अशी व्यवस्था केली आहे. आतां निरनिराळ्या ६८ जातींच्या मालाच्या आयातीचें नियंत्रण करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरवलें असून त्यासाठीं मुख्य बंदरांत खास अधिकारीहि नेमले आहेत. हें नियंत्रण ब्रिटिश साम्राज्यांतील देश, हिंदुस्थानांतील फ्रेंच व पोर्तुगीज वसाहती आणि आमच्या सरहद्दीजवळील देश ह्यांस लागू होणार नाहीं. साखर, साबण ह्यांसारखा माल ह्या देशांत जरूरीइतका तयार होत असल्यानें त्याच्या आयातीवरील नियंत्रणामुळें हिंदी लोकांची गैरसोय होण्यासारखी नसून त्या योगानें स्वदेशी उद्योगांस उत्तेजन मिळण्याचा संभव आहे. हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराची आजची बढी आहे ती ह्या नियंत्रणामुळें बिघडून जाण्याची भीति अर्थातच आहे आणि हिंदी मालाचे नेहमींची परराष्ट्रीय गिऱ्हाइकें दुसरीकडे जाणें स्वाभाविक आहे. त्यांच्या आयात मालावर नियंत्रण बसलें असतां तीं हिंदी मालहि कमी प्रमाणांत घेतील हें उघड आहे. तथापि, दोस्त राष्ट्रांत चालू युद्धांत अधिकांत अधिक सहाय हिंदी व्यापारापासून मिळणें अगत्याचें असल्यानें आयात व्यापाराचें नियंत्रण अपरिहार्य झालें आहे. हें येथें प्रामुख्यानें ध्यानांत येणें आवश्यक आहे कीं ह्या नियंत्रणाचा महत्त्वाचा उद्देश हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय हुंडणावळीस बळकटी आणणें हा आहे. साम्राज्याच्या बाहेरून ज्या मानानें माल कमी येईल त्या मानानें हुंडणावळीवर व चलनव्यवस्थेवर कमी ताण पडतो. निर्गत व्यापारांत निघणाऱ्या हुंड्यांचा उपयोग काटकसरीनें करणें सध्या अगत्याचें झालें आहे.

---

### हिंदुस्थानचा युद्धकालीन परराष्ट्रीय व्यापार

युरोपिअन रणांगणापासून हिंदुस्थान दूर आहे. इंग्लंड व फ्रान्स ह्या देशांची सर्व शक्ति युद्धोपयोगी सामान पुरवण्यांत एकवटली आहे आणि ह्या देशाच्या कच्या व पक्क्या मालास दोस्त राष्ट्रांत जादा मागणी उत्पन्न होऊन शत्रु राष्ट्रांच्या व तटस्थ देशांच्या मागणीची जागा तिनें भरून काढली असून ती अधिक झाली आहे. ह्या सर्व कारणांमुळें हिंदी निर्गत व्यापारांत वाढ होणें आणि त्या मानानें आयात व्यापाराचा विस्तार न होणें हे परिणाम अपेक्षित असेच आहेत; आणि ते गेल्या फेब्रुवारी महिन्याच्या व्यापार विषयक आकड्यांत प्रतिबिंबित झालेले दिसून येत आहेत. त्या महिन्यांत ग्रेटब्रिटननें घेतलेल्या हिंदी मालाची किंमत गेल्या वर्षीतील याच महिन्याच्या आकड्याच्या तिप्पट भरली. हे आंकडे अनुक्रमें करून ९ कोटि, २३ हजार रुपये आणि ३ कोटि, ५५ लक्ष रुपये असे होते. संबंद ब्रिटिश साम्राज्याच्या हिंदी मालाच्या फेब्रुवारी महिन्यांतल्या आयातीची किंमत यंदा १३ कोटि, ८० लक्ष रुपये होती. पूर्वीच्या

सालचा तत्सम आकडा ६ कोटि रुपये होता. १९३९-४० सालांतल्या पहिल्या अकरा महिन्यांत ब्रिटिश साम्राज्यांतील देशांनीं हिंदुस्थानचा १०२ कोटि रुपयांचा माल घेतला. पूर्वीच्या सालचा तत्सम आकडा ७७ कोटि, ८० हजार रुपये असा होता. १९३९-४० च्या फेब्रुवारींत २१ कोटि, ९४ लक्षांचा एकूण हिंदी माल परदेशीं गेला. पूर्वीच्या वर्षांतला तत्सम आकडा १३ कोटि होता. १९३९-४० सालच्या पहिल्या अकरा महिन्यांत हिंदुस्थानचा एकूण निर्गत व्यापार १८४ कोटि, ५२ लक्ष रुपयांचा झाला. पूर्वीच्या वर्षाच्या ह्या अवधींतला निर्गतीचा आकडा १४८ कोटि, ५३ लक्ष रुपये असा होता. हिंदुस्थानांत ग्रेटब्रिटनमधून फेब्रुवारींत आलेल्या मालाच्या किंमतींत फारच थोडी वाढ झाली. सबंध अकरा महिन्यांतला ब्रिटिश मालाचा आकडा ५२ कोटि, ४१ लक्ष रुपये होता. पूर्वीच्या सालचा तत्सम आकडा ३७ कोटि, ७३ लक्ष रुपये असा होता. सबंध ब्रिटिश साम्राज्यांतून झालेल्या आयातीचे हे दोन आकडे अनुक्रमें करून ८४ कोटि, ४३ लक्ष आणि ७९ कोटि, ३१ लक्ष असे होते. सर्व परदेशांतली मिळून एकूण आयातीची किंमत १५१ कोटि रुपये होती. पूर्वीच्या सालचा तत्सम आकडा १३७ कोटि रुपये होता.

---

### विमाकायद्यानें उत्पन्न केलेल्या अडचणी

विमाव्यवसायाचे बाबतींत १९३८ सालीं नवीन कायदा झाला, त्यांत विमेदारांच्या हिताच्या संरक्षणाचे दृष्टीनें करण्यांत आलेल्या तजविजी योग्य आहेत, ह्यांत शंका नाहीं. परंतु त्या योगानें विमामंडळयांच्या कारभाराच्या मार्गांत कित्येक अडचणी उपस्थित झाल्या असून, त्यांच्या अनुभवाचे आधारानें कायद्यांत आवश्यक त्या दुरुस्त्या करणें अगत्याचें झालें आहे. विमामंडळयांचें काम सुरळीत चालण्यांत विमेदाराचें हितच आहे, किंबहुना, ह्या दोघांचीं हितें परस्परावलंबी आहेत. हिंदी विमामंडळयांच्या अखिल भारतीय मध्यवर्ती मंडळाची तिसरी वार्षिक सभा नुकतीच दिल्ली येथें भरली होती, तिला पन्नास मंडळयांचे प्रतिनिधी उपस्थित होते आणि तीमध्यें वरील महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा झाली. आग्रा येथील स्वदेशी विमा कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. डोनेरिया हे सभेचे अध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या भाषणांत विमाकायद्याचे कांहीं प्रमुख दोष दाखवले आणि ते हिंदी विमामंडळयांस जाचक होत असल्याचें सांगितलें. मंडळयांनीं सरकारी कर्जरोख्यांत पैसा गुंतवण्याचे बाबतींत कायद्यानें बंधन घातलें आहे, त्याविरुद्ध त्यांनीं तक्रार केली आणि ते असें म्हणाले कीं, ह्या योजनेमुळें विमामंडळयांस होणारा नफा अत्यंत मर्यादित होऊन त्यांच्या प्रगतीस आडपळा येईल. विमामंडळयांच्या एजंटांनीं परवाने काढण्याविषयींची योजना अशीच त्रासदायक असल्याचें त्यांनीं आपलें मत दिलें. ह्या बाबतींत विमामंडळयांच्या मध्यवर्ती संस्थेनें विमा-सुपरिंटेंडंटकडे तक्रार केली आहे ती लक्षांत घेऊन कायद्यांत जरूर तो बदल सरकारनें करावा असेंहि त्यांनीं सुचवलें. अध्यक्षांच्या सूचनांस अनुसरून सभेनें महत्त्वाच्या प्रश्नांचे संबंधानें ठराव केला. नवीन मंडळयांचे बाबतींतलें आपलें धोरण सरकारनें स्पष्ट करावें आणि त्यांच्या अडचणींचा सहानुभूतिपूर्वक विचार करून त्याप्रमाणें कायद्याची अंमलबजावणी करावी असा दुसऱ्या एका ठरावाचा आशय होता.

---

### मुंबईचा शेअर बाजार

युद्धाच्या बातम्यांचा कमी-अधिक परिणाम बाजारभावांवर नेहमींच तात्काळ होत असतो. ज्यास जागतिक मागणी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ असते अशा मालाच्या किंमतींमध्यें तर त्यांच्या योगानें विशेष चलबिचल होते. ह्याहिपेक्षां अस्थिर असा कोणता बाजार असेल तर तो रोखे बाजार होय आणि त्यांतल्या त्यांत वायद्याच्या व्यवहारांत किंमतींची चंचलता विलक्षण असते. जर्मनीचें सैन्य बेल्जम व फ्रान्स ह्या देशांत घुसल्यानें काळजी वाटण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली आहे असें वाटून कलकत्ता, मुंबई व मद्रास येथील रोखे बाजारांत रोख्यांच्या किंमती सारख्या पडूं लागल्या. हें अस्थिरपणाचें वातावरण व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या सुरळीत व्यवहारांस अत्यंत प्रतिकूल असतें. शेअर बाजारांत व्यवहार करणारांस पडत्या-चढत्या किंमतींमुळें खरेदी-विक्रींत निश्चित धोरणानें वागणें कठिण होऊन ह्या बाजारांतील सवदयांस जुगारीचें स्वरूप प्राप्त होतें. रोखे व शेअर्स ह्यांच्या किंमतींत मोठा चढउतार झाल्याकारणानें व्यवहार करणारांस ठोकरा लागण्याची भीति असते. ही परिस्थिति लक्षांत घेऊन कलकत्ता, मुंबई, मद्रास, अहमदाबाद येथील शेअर बाजारांच्या नियामक मंडळानें गेल्या गुरुवारीं बाजार बंद ठेवले होते आणि कांहीं काळपर्यंत ते तसेच बंद ठेवण्याचें योजलें. मुंबईच्या नियामक मंडळानें आपला बाजार बिनमुदत बंद ठेवण्याची परवानगी प्रांतिक सरकाराकडे मागितली होती; परंतु तिला नकार मिळाला. वायद्याचे व्यवहार आणि रोखींचे व्यवहार ह्यांमध्यें महत्त्वाचें अंतर असल्यानें दोहोंस सारखीच बंदी लागू करण्याचें कारण दिसत नाहीं; तसेंच, सरकारी रोखे आणि कंपन्यांचे भाग ह्यांच्यामध्येंहि फरक करणें आवश्यक असल्याचें मत व्यक्त होत होतें. ही गोष्ट ध्यानांत बाळगून मुंबई सरकारनें शेअर बाजाराच्या नियंत्रक मंडळाच्या सरसकट बंदीच्या सूचनेस मान्यता दिलेली नाहीं. जनतेमध्यें युद्धपरिस्थितीचे बाबतींत भितीदायक व खोट्या कल्पना पसरून रोखे व शेअर्स ह्यांच्या किंमतींत अनपेक्षित व अयोग्य अशी घट पडून लोकांचें नुकसान होणार नाहीं याविषयीं खबरदारी घेतली जाणें अगत्याचें आहे. रोखे बाजार कांहीं दिवस सर्वस्वी बंद ठेवणें आणि विशिष्ट मर्यादेंत तो चालू ठेवणें ह्यांपैकीं जो अधिक उचित मार्ग असेल तोच सद्यःस्थितींत स्वीकारणें अगत्याचें आहे हें उघड आहे. ह्याबाबतींत रोखे बाजाराच्या नियामक मंडळावर जी विशेष जबाबदारी आहे ती ओळखून त्यानें सरकारास सल्ला दिला पाहिजे. मंडळ ही आपली जबाबदारी वेळोवेळ योग्य रीतीनें पार पाडील अशी सार्वत्रिक अपेक्षा आहे. सरकारनें त्यांच्याशीं वाटाघाट करून गेल्या शुक्रवारीं आपला निर्णय दिला.

---

### शेअर बाजाराविषयीं सरकारचा निर्णय

वायद्याचे व्यवहार कांहीं मर्यादित रोखे व भाग यांचे संबंधांत चालू होऊं शकतात. मुंबई सरकारचें असें म्हणणें होतें कीं, हे व्यवहार शेअर बाजाराच्या नियामक मंडळाच्या सूचनेप्रमाणें बंद ठेवण्यास एका अटीवर आपण मान्यता देऊं आणि ती म्हटली म्हणजे वायद्याच्या यादींत जे रोखे आहेत, त्यांची खरेदी-विक्री रोखीनें चालू रहावी ही होय. या प्रकारच्या व्यवहारामुळें बाजाराच्या झालेल्या करारांच्या पूर्ततेमध्यें मोकळीक मिळेल आणि

रोखेबाजार बंद ठेवण्याचा मुख्य हेतु साध्य होणार नाहीं असें नियामक मंडळाचें मत पडलें. चालू वायद्याची मुदत संपेपर्यंत म्हणजे जूनच्या १० तारखेपर्यंत तरी निदान रोखीच्या व्यवहारास बाजार मोकळा ठेवतां येणार नाहीं असा आपला अभिप्राय मंडळानें सरकारास कळवला. बरीच चर्चा झाल्यावर दोन बाजूंमधील मतभेदांतून तडजोड निघाली आणि तिचा निष्कर्ष आतां प्रसिद्ध झाला आहे. वायद्याच्या करारांचे यादींत समाविष्ट नसलेल्या रोख्यांची रोखीची खरेदी-विक्री शेअर बाजारांत गेल्या शनिवारपासून चालू व्हावी; चालू वायद्यांची मुदत संपताच म्हणजे १० जूनपासून सर्व रोख्यांच्या (वायद्याच्या यादींतले रोखे धरून) खरेदी-विक्रीस पूर्ण मुभा असावी आणि वायद्याचे सर्व व्यवहार बिनमुदत बंद रहावे अशी व्यवस्था सरकारनें मान्य केली आहे आणि तिची अंमलबजावणी आतां होईल. अहमदाबाद येथील रोखे बाजारानें हाच प्रश्न उपस्थित केला होता आणि मुंबईमध्यें मान्य करण्यांत आलेलें धोरण तेथेंहि लागू व्हावें असें ठरलें आहे. ह्या निकालाची अंमलबजावणी होण्यास वेळ मिळावा म्हणून अहमदाबादचा रोखेबाजार गेल्या शनिवारीं बंद ठेवण्याची परवानगी सरकारनें दिली. मुंबईच्या बाजारांत शनिवारींच सरकारचा निर्णय अंमलांत आला.

### प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कंपनीची प्रगति

| वर्ष | हप्त्यांचें उत्पन्न (रु.) | व्यवस्थेचा खर्च व कमिशन (रु.) | विमा खातीं फंड (रु.) | खर्चाचें प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १९३६ | १८,५८३ | १६,८५५ | ३७९ | ९०.६९% |
| १९३७ | २६,६०९ | १६,१५२ | ११,९८० | ६०.६९% |
| १९३८ | ३४,०७० | १९,१४२ | २४,४८० | ५६. २% |
| १९३९ | ५१,२०१ | २६,५६१ | ४२,०७१ | ५१.८७% |

### "विमा-जगत्"

ह्या मासिकाचा मे महिन्याचा अंक नेहमीप्रमाणें वक्तशीर प्रसिद्ध झाला असून त्यांत वाचनीय लेख व माहिती हीं देण्यांत आलीं आहेत. विमा कायद्यांत नुकत्याच झालेल्या दुरुस्तीमुळें विमा-मंडळ्यांच्या मार्गांत कित्येक अडचणी उपस्थित झालेल्या आहेत, त्यांचें विवेचन पहिल्या लेखांत आहे. विमा-विक्रेत्यांस निराशेचे टक्केटोणपे कसे खावे लागतात, ह्याचें सहृदयतेनें श्री. साने (मद्रास) ह्यांनीं केलेलें वर्णन उद्बोधक आहे. ह्या विषयावरील इतर लेखहि विचारप्रवर्तक आहेत. प्रस्तुत अंकांतील लहान गोष्टी व माहिती हीं मनोरंजक व बोधप्रद आहेत.

### बी. बी. अँड सी. आय. रेलवे सरकार घेणार?

पूर्वी झालेल्या करारास अनुसरून हिंदुस्थान सरकारास बी. बी. अँड सी. आय. रेलवे १९४१ चे अखेर योग्य मोबदला देऊन आपल्या ताब्यांत घेतां येईल. त्या संबंधाची एक वर्षाची नोटीस कंपनीस चालू साल अखेर दिली पाहिजे. ह्या प्रश्नाचा विचार हिंदुस्थान सरकार सध्या करीत आहे.

### शर्ले टेंपल चित्रपटाच्या धंद्यांतून निवृत्त होणार

शर्ले टेंपल ही जगप्रसिद्ध बालनटी आपल्या अकराव्या वर्षी चित्रपटाच्या धंद्यांतून निवृत्त होणार असें समजतें. चित्रपटांतील तिचें काम अत्यंत लोकप्रिय झालें असून तिची मिळकत लक्षांनीं मोजली पाहिजे.

### डॅनिश अंडीं

स्कँडेनेव्हिअन देशांतून ग्रेट ब्रिटनमध्यें दरवर्षी शंभर कोटि कोंबडीचीं अंडीं सरासरीनें जात असून जर्मनीनें नॉर्वे व डेन्मार्क पादाक्रांत केल्यामुळें हा पुरवठा बंद पडेल. पण दर माणशी दर आठवड्यास अर्धे अंडें ह्यामुळें ब्रिटिश जनतेस मिळणार नाहीं एवढाच ह्याचा अर्थ असून ही गोष्ट अगदीं क्षुल्लक आहे ह्यांत शंका नाहीं.


# BHARAT

## Insurance Co., Ltd.

**COMPLETES IN 1939**

SOLID, SOUND, FRESH BUSINESS of

**OVER RUPEES 2 CRORES 8 LAKHS**

UNIVERSALLY RECOGNISED AS

A Leader among Indian Life Offices

*Previous rates of Bonus maintained as a result of the valuation for the quinquennium ended 31st Dec. 1938*

**Rs. 22-8** for Whole-Life Policies

**Rs. 17-8** for Endowment Policies

*Chairman:* SETH RAM KRISHNA DALMIA

*Director-in-Charge:* RAJENDRA KUMAR JAIN

*BRANCHES*

Agra, Ahmedabad, Ajmer, Allahabad, Ambala, Amritsar, Asansol, Bangalore, Barisal, Bombay, Calcutta, Colombo (Ceylon), Dacca, Dehra Dun, Delhi, Ernakulam, Gauhati, Indore, Jalpaiguri, Jammu, Karachi, Lahore, Lucknow, Madras, Madura, Multan, Muzaffarpur, Nairobi (E. Africa), Nagapur, Najibabad, Patna, Peshawar, Poona, Rajmundry, Rangoon (Burma), Rawalpindi, Secunderabad, Shillong, Sialkot, Sukkur, Surat, Karwar

Head Office: LAHORE

कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड, पुणें

## विमेदारांकरितां नोटीस

(१) नोटीस देण्यांत येते कीं, १९३८ च्या विमा कायद्यान्वयें, या कंपनीच्या विमेदारांची सभा पुणें येथें कंपनीच्या रजिस्टर्ड कचेरींत—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८० सदाशिव पेठ, पुणें—रविवार ता. ३० जून १९४० रोजीं दुपारीं ४ वाजतां पुढील कामाकरितां भरेल.

मतदार विमेदारांतर्फे संचालक मंडळावर
तीन डायरेक्टर्स निवडणें.

(२) जे विमेदार डायरेक्टर म्हणून निवडून येण्यास पात्र असतील व ज्यांची निवडणुकीस उभे राहण्याची इच्छा असेल अशा विमेदारांनीं आपापले अर्ज कंपनीकडे पाठवावेत अशी विनंति आहे. असे अर्ज कंपनीच्या मुख्य कचेरींत सभेच्या तारखेच्या आधीं निदान १० दिवस पोंचतील अशा बेतानें रजिस्टर्ड पोस्टानें पाठवावेत. अशा प्रकारचे अर्ज इंग्रजी अगर मराठी भाषेमधून केले पाहिजेत.

(३) विमेदारांतर्फे होणाऱ्या डायरेक्टरांच्या निवडणुकीमध्यें उमेदवार म्हणून लायक ठरण्यास खालील गोष्टींची पूर्तता होणें अवश्य आहे.

(अ) या कंपनींत एन्डोमेन्ट अगर होल लाइफ विमा असावा, मात्र असा विमा स्वतःच्या नांवावर बेचन केलेला अगर बदलून घेतलेला चालणार नाहीं.

(आ) अशा विम्याची एक अगर अनेक पॉलिसीज मिळून एकूण रक्कम त्यावर निवडणुकीपूर्वी मिळालेल्या बोनससह रुपये दोन हजारांपेक्षा कमी नसावी.

(इ) असा विमा कमीत कमी तीन वर्षे चालू असलेला पाहिजे, व त्यावर कसल्याही प्रकारचा बोजा असतां कामा नये.

(ई) असा विमेदार कोणत्याही विमा कंपनीचा डायरेक्टर, मॅनेजर, कायद्याचा किंवा टेक्निकल सल्लागार, मॅनेजिंग एजन्ट, विमा एजन्ट अगर नोकर किंवा विमा एजन्टांना नोकरीस ठेवणारा इसम नसावा.

मात्र असा इसम या कंपनीचा निवडून आलेला डायरेक्टर असला तरी चालेल.

(४) सभेस हजर राहूं इच्छिणाऱ्या प्रत्येक विमेदारानें सभेंत प्रवेश मिळविण्याकरितां जरूर असलेल्या दाखल्यासाठी अर्ज केला पाहिजे व असा अर्ज सभेच्या तारखेच्या आधीं निदान पंधरा दिवस कंपनीच्या मुख्य कचेरींत येऊन पोंचला पाहिजे.

(५) विमेदारांनीं आपलीं मतें सभेंत समक्ष हजर राहून द्यावींत किंवा प्रॉक्सीनें द्यावींत. प्रॉक्सीनें मतें द्यावयाचीं झाल्यास तशा प्रॉक्सी सभेच्या तारखेच्या आधीं निदान सहा दिवस कंपनीच्या मुख्य कचेरींत दाखल झाल्या पाहिजेत.

बोर्डाचे हुकुमावरून,

पुणें, अभ्यंकर आणि कंपनी,

तारीख ११-५-४० मॅनेजिंग एजन्ट्स.

---

झारापकर टेलरिंग कॉलेज, पुणें २

पुणें येथील झारापकर टेलरिंग कॉलेजमध्यें दर वर्षाप्रमाणें शंभर रुपये फीच्या डिप्लोमा कोर्सच्या शिक्षणाकरतां पांच हरिजन विद्यार्थी मोफत घ्यावयाचे आहेत. तरी हरिजन विद्यार्थ्यांनीं शिफारस पत्रांसह ता. १० जूनपर्यंत अर्ज करावयाचे आहेत.

युद्धविषयक खोट्या बातम्यांविरुद्ध सूचना

युद्धपरिस्थितीसंबंधानें जनतेमध्यें भीति उत्पन्न करण्यासारख्या गप्पा मुंबईंत पसरवण्यांत येत असल्यानें प्रांतिक सरकारानें असल्या कृत्याविरुद्ध सूचना दिली असून हे प्रकार शिक्षेस पात्र असल्याचें जनतेस कळवलें आहे.

गव्हाच्या पिकाचा अंदाज

१९३९–४० च्या हंगामांत ३ कोटी, ३६ लक्ष एकरांत १ कोटी, ६ लक्ष टन गहू निघेल असा अंदाज करण्यांत आला आहे. पूर्वीच्या वर्षाच्या फेर अंदाजाचे मानानें यंदा क्षेत्रांत ४ टक्के घट पण उत्पादनांत ९ टक्के वाढ होईल असें ह्या आकड्यांवरून दिसतें.

---


कंपनीनें सुरवातीपासून ५% वाटावयाचा नफा जाहीर केला आहे.

## आयुर्वेद रसशाळा पुणें, लिमिटेड.

सदर कंपनीचे शेअरमध्यें रक्कम गुंतविणें फायद्याचें आहे.

सुरवातीचें भांडवलः—रु. १,००,०००

वाढविलेलें भांडवलः—रु. ५,००,०००

आयुर्वेद रसशाळेचीं औषधें, शास्त्रोक्त, प्रमाणबद्ध, गुणकारी व स्वस्त असतात. म्हणून औषधांची मागणी झपाट्यानें वाढत आहे. वाढत्या मागणीचा भरपूर पुरवठा करण्यासाठीं यंत्रसामुग्रीचे साहाय्यानें मोठ्या प्रमाणावर औषधी निर्माण करण्याकरितां भांडवल वाढविलें आहे.

—ऑर्डिनरी शेअर्स—

प्रत्येकीं २५ रु. चा १ भाग याप्रमाणें १२००० सामान्य भाग अर्जासोबत १० रु. अर्ज मंजुरीनंतर ५ रु. व पुढें ५ रु. चे दोन हप्ते.

प्रत्येकीं १००० रु. चा १ भाग याप्रमाणें २००० प्रेफरन्स शेअर्स अग्रहक्क भाग भाग मंजुरीनंतर द. द. शें. ५ टक्के क्युम्युलेटिव्ह टॅक्स फ्री. अर्जासोबत २५ रु. अर्ज मंजुरीनंतर २५ व पुढें प्रत्येकीं २५ रु.चे दोन हप्ते.

युद्धजन्य परिस्थितींत देशी औषधांचे कारखान्यांत भांडवल गुंतविणें अत्यंत फायद्याचें असल्यामुळें सदरहू भाग घेण्याची त्वरा करा. आतापर्यंत सामान्य भाग १ लाख रुपयांवर व प्रेफरन्स शेअर्स पन्नास हजार रुपयांवर खपले आहेत.

—डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन—

डॉ. रा. ह. [illegible], एम. ए., एम्. डी. हे असून कंपनीचे कारभारावर देखरेख व अनुभवी सल्ला देण्याचें काम प्रसिद्ध वैद्य, डॉक्टर्स, वकील, व्यापारी व जमीनदार यांचें बनविलेलें डायरेक्टर बोर्ड करीत आहे.

## हिट्लरशाहीच्या प्रतिकारार्थ राष्ट्रांचा स्वार्थत्याग

### फ्रान्समधली परिस्थिति

हिट्लरनें आपल्या राजकीय वेडाच्या भरांत जगावर केवढी आपत्ति आणली आहे, ह्याची युरोपच्या बाहेरील लोकांनीं नुसती कल्पनाच केली पाहिजे. प्रस्तुत युद्धांत लाखो माणसें प्राणास मुकतील, लाखो घरादारांची राखरांगोळी होईल आणि अनंत कुटुंबें नाश पावतील. कोट्यवधि रुपये किंमतीच्या संपत्तीचा चुराडा होऊन दारिद्र्याची भीषण छाया चोहोंकडे पसरेल. हा नाश सर्व जगास भोवेल आणि त्यांतील निरनिराळ्या राष्ट्रांस हिट्लरच्या रानटी हिंस्रपणाचे घोर परिणाम भोगावे लागतील. जर्मनी प्रस्तुत घातक युद्ध लढवून काय मिळवणार आहे? लाखो अनाथ बायकांमुलांचे आणि निराश्रित व ग्रस्त लोकांचे शाप त्यास मिळतील. सध्या पादाक्रांत केलेले प्रदेश जर्मनीस पचणार नाहींत आणि प्रस्तुतचें युद्ध त्यास जवळ जवळ सर्व मानवी समाजाशींच करावें लागणार आहे. हिट्लरला अंतिम विजय मिळणें अशक्य आहे, कारण त्याचा जय म्हणजे मानवी संस्कृतीचा नाश होय. युद्धानें प्रत्यक्ष जर्मन लोकांचें तरी काय हित होणार आहे? लाखो जर्मन हिट्लरच्या वेड्या महत्त्वाकांक्षेस बळी पडणार आहेत. प्रस्तुत युद्धाच्या तयारी प्रीत्यर्थ अनेक कोटि रुपये खर्च झाले आहेत व तें चालू आहे तोंपर्यंत होतील. हा खर्च भागवण्यासाठी त्यांस करांचा जबर बोजा सोसावा लागत असून त्यांच्या पोटास चिमटा बसत आहे. खाण्यापिण्याच्या व वापरावयाच्या जिनसांचा जर्मनीमध्यें तुटवडा आहे आणि सामान्य जनतेस हालांत दिवस काढावे लागत आहेत. जर्मनीनें चालवलेल्या अत्याचारांचा प्रतिकार करण्यासाठीं इंग्लंडमधील सरकारास राष्ट्राचें शक्तिसर्वस्व वेचावें लागत आहे. त्यानें जनतेस अपरिमित स्वार्थत्याग करून शत्रूचा यशस्वी रीतीनें प्रतिकार व पाडाव व्हावा म्हणून आपलें सर्वस्व राष्ट्रास अर्पण करण्यास प्रवृत्त केलें आहे. ब्रिटिश जनतेनेंहि आणीबाणीचा प्रसंग ओळखून सरकारास मनःपूर्वक पाठिंबा दिला आहे. पक्षभेद व मतभेद नाहींसे होऊन ब्रिटिश राष्ट्र एकजुटीनें शत्रूशीं दोन हात करण्यास सज्ज झालें आहे.

फ्रान्सचा स्वार्थत्याग व संघटन शत्रू दाराशीं आला असतां अपूर्व रीतीनें उठून दिसत आहे. फ्रान्स हें शिपायांचें लढाऊ राष्ट्र आहे, ह्यामुळें त्यास अनेक आर्थिक अडचणी सहन करणें प्राप्त झालें आहे. युद्धास प्रारंभ होतांच १८ ते ४९ वयाच्या सर्व नागरिकांस फ्रेंच सरकारनें आपापल्या सैन्य विभागांत दाखल होण्यास आज्ञा केली. राष्ट्रीय महत्त्वाच्या बिन लष्करी कामास अत्यंत आवश्यक लोक तेवढे ह्या सैन्य भरतींतून वगळण्यांत आले. पंचेचाळीस लक्ष नागरिक ह्याप्रमाणें शिपायाच्या पोशाखांत तयार आहेत आणि वगळलेल्या लोकांवरहि लष्करी अधिकार चालत असून हुकूम होतांच त्यांस फौजेंत गेले पाहिजे. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं उद्योगधंदे व शेती ह्यांमध्यें काम करणारांचा तुटवडा भासत आहे. कामकऱ्यांची संख्या ह्यामुळें जरूरीपेक्षा कमी झाली असतां उत्पादन व निर्गत व्यापार चालू ठेवण्याचा अवघड प्रश्न फ्रान्सला सोडवावयाचा आहे. बिनलष्करी खर्च मर्यादेंत ठेवला जात आहे आणि हा सर्व स्वार्थत्याग फ्रेंच जनता खुषीनें करीत आहे. चाळीस-पन्नास लक्ष इतक्या सर्व लष्करी वयाच्या लोकांस उत्पादनाच्या कामांतून काढून युद्धावर पाठवल्यामुळें फ्रेंच सरकारास कारखान्यांतील कामकऱ्यांकडून अधिक काम घ्यावें लागत आहे आणि असें करतांना त्यांच्या हितसंबंधांची तें काळजी घेत आहेत. कामकरी वर्गहि राष्ट्राची गरज लक्षांत घेऊन खुषीनें स्वार्थत्याग करीत आहे. शेतीचें काम करणाऱ्या लोकांचा तुटवडा पडूं नये ह्याविषयींहि खबरदारी घेण्यांत येत आहे. बेकार लोकांस काम देण्यांत येऊन निकामी लोकांचाहि शक्य तो उपयोग केला जात आहे. स्त्रियांनीं लढाईवर जाणाऱ्या पुरुषांची जागा उद्योगधंद्यांत घेतली आहे. युद्धसामुग्रीच्या कारखान्यांत तीन लक्ष स्त्रिया काम करीत आहेत. आणि दारूगोळ्याच्या कारखान्यांतील कामगारांमध्यें ३० टक्के स्त्रिया आहेत. स्त्रिया हें काम खुषीनें करीत आहेत. तथापि, जरूर वाटल्यास सक्तीचाहि उपयोग करण्यास कायद्यानें सरकारनें अधिकार स्वतःकडे घेतला आहे.

वरील माहितीवरून असें दिसून येईल कीं नागरिकांची मोठी संख्या लष्करी कामगिरीसाठी सज्ज झाल्या कारणानें उद्योगधंद्यांतल्या कामांत फ्रान्समध्यें तूट पडत आहे. खाजगी कारखान्यांवर नियंत्रण घालण्याचा अधिकार सरकारच्या हातीं आहे आणि बिनलष्करी गरजांस दुय्यम स्थान देण्यांत आलें आहे. फौजेंतले शिपाई व बिनलष्करी नागरिक ह्या सर्वांसच काटकसरीनें रहावें लागत आहे. करांचा बोजाहि हलका नाहीं. प्राप्तीवरील कर जबर आहे आणि अविवाहितांस खास कर भरावा लागतो. जनतेचा रोजचा खर्च मर्यादेंत ठेवण्याची व्यवस्था झाली आहे आणि निरनिराळ्या जिनसांच्या किंमती ठरवून टाकल्या आहेत. युद्ध यशस्वी करण्यासाठीं फ्रेंच जनतेनें आपली रहाणी खाली आणली आहे आणि हा स्वार्थत्याग सर्वांवर सारखा लादण्यांत आला आहे. इंग्लंडमध्यें तेथील सरकारानें असाच स्वार्थत्याग राष्ट्राकडून घेण्याचा निश्चय केला आहे. हिट्लरशाहीच्या अमानुष जुलुमांतून स्वतंत्र राष्ट्रांस व मानवी संस्कृतीस वांचविण्यासाठीं जगास आपत्ति सोसण्याचा प्रसंग आला आहे. प्रस्तुतसारख्या जगड्व्याळ युद्धाचे दुष्परिणाम सर्व राष्ट्रांमध्यें पसरणें अपरिहार्य आहे आणि ह्या रीतीनें सबंध जगाचें वैर जर्मनीनें संपादन केलें आहे.

---

### हिंदी रेलवेजचें उत्पन्न वाढत आहे

हिंदी रेलवेजच्या उत्पन्नाचे आकडे वेळोवेळ प्रसिद्ध होतात, त्यांवरून ह्या उत्पन्नांत सारखी वाढ होत चालल्याचें दिसून येतें. एप्रिल १ ते १० मे ह्या अवधींत ह्या रेलवेजचें उत्पन्न १२ कोटि, १२ लक्ष रुपये भरलें. १९३९-४० च्या तत्सम काळांतील तत्सम आकड्यापेक्षा सुमारें १ कोटि रुपयांनीं ही रकम अधिक आहे.

### पोस्टांतील बेपत्ता पत्रें

बिनमालकी पत्रांची व्यवस्था करण्यासाठीं हिंदी पोस्ट ऑफिसनें 'डेड लेटर ऑफिसें' ठेवलीं आहेत, त्यांच्या हातून गेल्या तीन वर्षांत पावणेदोन कोटि बेपत्ता पत्रांची वासलात लावण्यांत आली. त्यांमध्यें १८ लक्ष रुपये किंमतीचे चेक्स, चलनी नोटा इत्यादि जिन्नस आढळले. वरील ऑफिसांच्या क्षेत्रांत दररोज सरासरीनें शंभर वर पत्ता नसलेलीं पत्रें पोस्टाच्या पेट्यांत पडतात.

### ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं दोन कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकण्यांत आलीं. त्यांवर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ११ पै इतका व्याजाचा दर सरासरीनें बसला.

## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना—७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,१३,००,०००

**डायरेक्टर्स**—सर चुनीलाल मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., के. टी. (रजेवर); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई; ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. फेराड,

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी, ( मुंबई ), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंघी स्क्वेअर बँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ), जमशेदपूर

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**चालू ठेवीवरील व्याजाचा दर**

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों, व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय, ट्रस्टी, या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

## लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल.......रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल ...रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल.......रु. | ३,२४,३०० |
| वसूल झालेलें भांडवल...रु. | १,६२,१५० |

**शाखा**

अॅक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

**डायरेक्टर्स**

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन, श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन, श्री. एन. जी. पवार, श्री. डी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. बर्वे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. गोखले, मॅनेजर.



## पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**जळगांव.**

( स्थापना : मे १९१६ )

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल....... | ४,६९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।– |
| इतर फंड्स्. ...... | ३,७७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के ( सहा वर्षांपासून )

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



## बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

☞ किं. १ रु. ८ आणे ☜

१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

" अर्थ " ग्रन्थमाला, : : पुणें ४.

## राष्ट्रीय सोडती आणि सोडत कर्जे

कित्येक युरोपिअन देशांत सरकारी तिजोरीची भरती करण्यासाठी सोडतींचा उपयोग करण्याचा प्रघात आहे. कराचा बोजा नागरिकांमध्यें नेहमींच अप्रिय असतो आणि सरकारास तर खर्चाकरितां पैसा हवा असतो. दुसऱ्या बाजूनें पाहिलें असतां लोकांत जुगारीचें विलक्षण वेड असतें आणि त्याचा फायदा कांहीं व्यक्ती घेत असतात. ह्या कारणानें कित्येक देशांतील राज्यकर्ते सोडती आपल्या नियंत्रणाखालीं ठेवून त्यांच्या फायद्यांत अंशभागी होतात किंवा स्वतःच त्या चालवतात. सोडत म्हणजे शुद्ध जुगार असल्यानें खाजगी फायद्याकरितां तर नाहींच, पण सार्वजनिक हितासाठीहि ती चालवणें नीतीस धरून नाहीं हें मत अनेक देशांत रूढ असल्याकारणानें सोडतीस प्रतिबंध करण्यांत येतो. कांहीं सार्वजनिक कार्याच्या हितासाठीं क्वचित सोडतीस सरकारी मान्यता दिली जाते, पण ती अपवादात्मक अशी समजण्यांत येते. सोडतीपेक्षां कमी आक्षेपार्ह असा मार्ग कांहीं देशांत सरकारांकडून अवलंबला जातो आणि तो म्हटला म्हणजे सोडतीच्या स्वरूपाचे कर्जरोखे (प्रीमियम बॉंड्स) विकणें किंवा त्यांपैकीं कांहींवर ते धारण करणारांस बक्षिसें देणें हा होय. ऑस्ट्रियामध्यें अशा तऱ्हेच्या बक्षिसांचे सरकारी कर्जरोखे फार प्रिय झाले होते. ठराविक व्याजांच्या दरापेक्षां अधिक दरानें कांहीं रोख्यांवर व्याज देण्यांत येतें, त्यांतहि जुगारीचें आमिष असतें. सरकारास कमी व्याजानें भरपूर कर्ज लोकांकडून मिळतें आणि लोकांसहि बक्षिसें मिळवण्याची किंवा चढीच्या दरानें व्याज मिळवण्याची लालूच असते. प्रस्तुत युद्धाचे अडचणींत ब्रिटिश सरकारानें सोडतीनें पैसे किंवा कर्जे उभारावीं अशी सूचना एका लेखकानें केली आहे. जनतेची प्रवृत्ति निरनिराळ्या स्वरूपांतील जुगारीकडे आहे तिचा फायदा सार्वजनिक हिताकडे सरकारनें करण्यास हरकत नाहीं असें त्याचें म्हणणें आहे. तथापि, हा मार्ग इंग्लंडमध्यें कितीसा मान्य होईल ह्याची त्यासहि शंका वाटत आहे.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | १०७—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०५—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ८९—२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०१—० |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ९०—० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९५—२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०३—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०२—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) ... ... | १०९—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | ११९—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १३४—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १००—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ४% ... | ३२–१० |
| इंपिरिअल बँक (५००) १२% ... ... | १४८५—० |
| पंजाब नॅ. को. बँक (५०) ४% ... ... | ५३—० |
| अ‍ॅलाहाबाद बँक (१००) ३½% ... ... | १००—८ |

### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४८—२—० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६४—८—० |


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे

★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस

★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस : ९९२A सदाशिव, पुणें २

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.




स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डि. नं. ६)

२५।३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

—ॐ सत्यमेवजयते—

सुकामेवा एक आणा पासून

निवडक सर्व किराणा

लोणच्याचें साहित्य
म्हणजे

मोहरीची डाळ, माहरी भुकणी, मोहरी तेल (पॅक बाटल्या), मेथी भरडा, स्पेशल हिंग,
तांबडे लाल (भडक) तिखट भुकणी इत्यादि खात्रीचा माल तयार आहे.

लोणच्याचा तयार मसाला पूड तयार आहे!
—: दत्तात्रय नारायण हेर्जीब :—
किराणा व सुकामेवा व्यापारी, २० शुक्रवार पेठ, पुणें २
लोणचीं, पापड, मसाले, मेतकूट सदैव तयार असतात.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.